जनसंपर्क कक्ष
10 MAR 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिलांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस

## प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वर्षातला प्रत्येक दिवस हा महिलांचाच असून, आजचा दिवस हा त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाची अंतर्गत तक्रार निवारण समिती, बेटी बचाओ अभियान आणि कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानावरून डॉ. पाटील बोलत होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, भारतात महिलांमध्येसुद्धा ग्रामीण, शहरी असा भेद आहे. त्यांच्यासमोरील समस्यांचे स्वरूप वेगळे आहे.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योजी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. अंतर्गत डॉ. वर्षा जाधव यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर उपकुलसचिव संध्या आडसुळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. प्रकाश गायकवाड, अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होत्या.

लोकमत

# चेतनसिंग सोळंकी उद्या विद्यापीठात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सौरऊर्जेचा प्रचार व प्रसाराचे ब्रीद घेऊन गेल्या काही वर्षांपासून भारत भ्रमंण करणारे सौरमानव तथा सोलर गांधी आणि एनर्जी स्वराज्य फौंडेशनचे संस्थापक प्रा. चेतनसिंग सोळंकी उद्या, शनिवारी शिवाजी विद्यापीठाला भेट देणार आहेत. यानिमित्त त्यांचे सकाळी अकरा वाजता राजर्षी शाहू सभागृहात हवामान बदल या विषयावर व्याख्यान होणार आहे. विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाने त्यांचे हे व्याख्यान जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट कार्यक्रमांतर्गत आयोजित केले आहे..

लोकमत

# विधी परीक्षा अर्ज प्रक्रिया १७ पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ३ व ५ वर्षे विधी अभ्यासक्रम परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस १७ मार्चपासून सुरुवात होणार आहे.

विद्यापीठाने विधी विभागाच्या परीक्षा अर्जाबाबतचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालय व पदव्युत्तर विभागात २३ मार्चअखेर अर्ज करता येणार आहे. महाविद्यालय, पदव्युत्तर विभागाने २४ मार्चदरम्यान परीक्षा अर्ज याद्या सादर कराव्यात, असे आवाहन परीक्षा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची आज सिनेट सभा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ अधिसभेची (सिनेट) बैठक शुक्रवारी दुपारी बारा वाजता होणार आहे. अधिसभा बैठकीत विद्यापीठ अर्थसंकल्प, ऑडिट रिपोर्ट यासह विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेतले जाणार आहेत. अशी माहिती प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : एनर्जी स्वराज फौंडेशनचे संस्थापक प्रा. चेतन सिंग सोळंकी शनिवारी (दि.११) शिवाजी विद्यापीठास भेट देणार आहेत. याप्रसंगी ते विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता 'हवामान बदल' या विषयावर विशेष व्याख्यान देणार आहेत. सोळंकी आयआयटी मुंबई येथे सौरविज्ञान विषयाचे प्राध्यापक आहेत.

सकाळ

# विद्यापीठाचे आज अंदाजपत्रक

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाची सिनेट (अधिसभा) शुक्रवारी (ता. १०) विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दुपारी बाराला सुरू होईल. त्यात सन २०२३-२०२४ या वर्षातील ५३८ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाचे (बजेट) सादरीकरण होणार आहे. नव्या सिनेट आणि इतर अधिकार मंडळांची स्थापना झाल्यानंतरचे हे पहिलेच बजेट असल्याने त्याकडे प्राचार्य, अधिविभागप्रमुख, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी या घटकांचे लक्ष लागले आहे.

या सिनेटच्या बैठकीत प्रश्नोत्तराचा तास संपल्यावर अंदाजपत्रकाचे सादरीकरण होईल. त्यावरील काही प्रश्नांबरोबरच अन्य काही मुद्यांवर चर्चा रंगेल. त्यात तक्रार निवारण समितीकडे प्रलंबित असलेली प्रकरणे, गरजेपेक्षा जादा प्रमाणात नियुक्त केलेले रोजंदारी कर्मचारी आणि त्यांच्या मानधनावर होणारा खर्च, कोरोना काळातील ऑनलाईन परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाद केला त्याबाबतची दंड आकारणी सक्षम प्रमाद समितीसमोर न जाता करणे, शिक्षकांच्या स्थान निश्चितीची प्रकरणे नाकारणे आदी मुद्दांचा समावेश आहे. दरम्यान, गेल्यावर्षी विद्यापीठाने ५१९ कोटी चार लाख रुपयांचे अंदाजपत्रक सिनेटच्या बैठकीत मंजूर झाले होते. त्यातील आठ कोटी ८२ लाख रुपयांची तूट ही विद्यापीठ निधीतील शिलकीमधून भरून काढली. या अंदाजपत्रकात संशोधन, गुणवत्ता शिष्यवृत्ती, वसतिगृह, इनडोअर स्पोर्टस् कॉम्प्लेक्स आदींसाठी तरतूद केली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 MAR 2023
सकाळ

# भारताला शेजारील राष्ट्रांशी संबंध सुधारण्याची गरज

## श्रीराम पवार; शिवाजी विद्यापीठात डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : विश्वगुरू, महासत्ता व्हायचे असेल, तर भारताला प्रथम आपल्या शेजारील नेपाळ, भूतान, श्रीलंका, बांगलादेश या राष्ट्रांशी संबंध सुधारणे गरजेचे आहे. लष्करी, आर्थिक ताकदही वाढविणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाच्या 'पी. जी. डिप्लोमा इन इंटरनॅशनल रिलेशन ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज्'तर्फे आयोजित डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'भारताचे परराष्ट्र धोरण : सातत्य आणि बदल' असा त्यांचा विषय होता. अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार हॉलमधील या व्याख्यानमालेस प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी राज्यशास्त्र अधिविभागाच्या 'पी. जी. डिप्लोमा इन इंटरनॅशनल रिलेशन ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज्'तर्फे आयोजित डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार यांनी विचार मांडले. या वेळी डावीकडून विजयमाला देसाई, विलास शिंदे, प्रकाश पवार उपस्थित होते.**

श्रीराम पवार म्हणाले, "भारताच्या शेजारील सर्व राष्ट्रांमध्ये विविध माध्यमांतून चीनने शिरकाव केला आहे. त्यामुळे बांगलादेश वगळता अन्य राष्ट्रांमध्ये थेट भारताचे म्हणणे ऐकण्यासारखी परिस्थिती नाही. हे चित्र बदलण्यासाठी भारताला या राष्ट्रांशी संबंध सुधारावे लागतील. दुसऱ्या महायुद्धापूर्वीची आणि आजची परिस्थिती परराष्ट्र धोरणाच्या अनुषंगाने बदलली आहे. अणुबॉम्बच्या प्रत्यक्ष वापरानंतर सैन्यावर आधारित लढल्या जाणाऱ्या युद्धापेक्षा शस्त्राच्या आधारे लढले जाणारे युद्ध निर्णायक ठरू शकते, हे जगाने पाहिले आहे. त्यानुसार लष्करी ताकद वाढविण्याचा सर्व राष्ट्रांनी प्रयत्न केला. पंतप्रधान ज्या देशात जातील, तो देश आपण जिंकला, अशी भ्रामक कल्पना सोडून देऊन लष्करी, आर्थिक ताकद वाढविण्याची गरज आहे. बदलत्या काळानुसार भारताने परराष्ट्र धोरणाचा अवलंब करणे महत्त्वाचे ठरेल."

डॉ. शिंदे म्हणाले, "जागतिक राजकारणात कोरोनापूर्व आणि कोरोनानंतर अशा पद्धतीने मोठे बदल झाले आहेत. कोरोनापूर्व काळात भौतिक शस्त्राच्या आधारे महासत्ता बनण्याचा प्रयत्न विविध राष्ट्रांकडून सुरू होता. कोरोनानंतरच्या काळात मात्र सध्या जैविक शस्त्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होण्याची भीती आहे."

प्रमुख उपस्थितांच्या हस्ते रोपाला पाणी घालून उद्‍घाटन झाले. डॉ. अंजली पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. डॉ. पाटील यांच्या ज्येष्ठ भगिनी विजयमाला देसाई, बंधू झुंजारराव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. भारती पाटील, आरती पाटील, जयमाला सूर्यवंशी, वैशाली मोहिते, विवेक देसाई, विलास देसाई, विश्वनाथ केसरकर, डॉ. सुखदेव उंदरे आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

### ...तर जगातील सर्व राष्ट्रांना झळ बसणार

■ श्रीराम पवार म्हणाले, "जागतिक पातळीवर सुरुवातीला महासत्ता म्हणून इंग्लंड समोर आले. त्यानंतर रशियाची उभारणी झाली. अमेरिका महासत्ता म्हणून पुढे आली. आता चीन महासत्ता बनू पाहत आहे. सध्या चीन आणि अमेरिका यांच्यातील वर्चस्ववादातून कधी युद्धाची ठिणगी पडेल, हे सांगता येत नाही. ते झाल्यास त्याच्या झळा जगातील सर्व राष्ट्रांना बसणार आहेत."

### डॉ. अंजली पाटील यांचे जीवनकार्य प्रेरणादायी

■ 'युनो'मधील शांतता मोहिमेत डॉ. अंजली पाटील यांनी योगदान दिले. त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे श्रीराम पवार यांनी सांगितले. १९७० च्या दशकात संदर्भ साधनांची कमतरता असतानाही डॉ. पाटील यांनी 'फेटो' विषयावर शिवाजी विद्यापीठातून पीएच.डी केली. त्यांचे जीवनकार्य नव्या पिढीला प्रेरणादायी ठरणारे आहे. त्यांचे चरित्र हे कुटुंबीयांनी पुस्तक स्वरूपात समाजासमोर आणावे, असे आवाहन डॉ. शिंदे यांनी केले.

### जागतिक राजकारणात अर्थकारणाची मोठी भूमिका

■ श्रीराम पवार म्हणाले, "जागतिक पातळीवर देशा-देशांमधील राजकारणात अर्थकारणाची मोठी भूमिका असते. त्याचे उदाहरण अमेरिका आहे. अरब राष्ट्रांतील खनिज तेलामुळे अमेरिका त्यांच्याशी चांगले संबंध ठेवून होते. मात्र, स्वतःच्या देशात तेलाचे साठे मोठ्या प्रमाणात सापडल्याने अमेरिकेने या अरब राष्ट्रांतील कारभाराकडे लक्ष देणे बंद केले."

सकाळ

# 'लॉ' परीक्षा अर्ज प्रक्रिया आजपासून

कोल्हापूर : विधी (लॉ) अभ्यासक्रमाच्या (तीन आणि पाचवर्षीय) सत्र तीनच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया शिवाजी विद्यापीठाकडून शुक्रवार (ता. १०)पासून सुरू होणार आहे. शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ मधील ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या हिवाळी सत्रातील परीक्षा ऑफलाईन स्वरूपात होतील. त्यासाठी विनाविलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत २३ मार्चपर्यंत आहे. महाविद्यालय, अधिविभागांनी विद्यापीठात परीक्षा अर्जांच्या याद्या सादर करण्याची मुदत २७ मार्चपर्यंत आहे. दरम्यान, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन टीचर ट्रेनिंग एज्युकेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन एज्युकेशन या अभ्यासक्रमांच्या एकूण ६७८ विद्यार्थ्यांनी परीक्षा गुरुवारी (ता. ९) दिली.

तरूण भारत

# विद्यापीठाची आज अधिसभा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची शुक्रवार १० रोजी सकाळी ११ वाजता अधिसभा सुरू होणार आहे. या अधिसभेत विद्यापीठातील विविध अधिविभाग, वसतिगृह, संशोधनासाठी काय तरतूद केली, याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष राहणार आहे. सध्या निवडून आलेल्या अधिसभा सदस्यांचे पहिलेच बजेट आहे. या बजेटमध्ये २०२३-२०२४ चे वार्षिक अंदाजपत्रक मान्य केले जाईल. अधिसभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असणार आहेत. विद्यापीठाची आज अधिसभा होणार आहे. या अधिसभेच्या ठरावातील विषयपत्रिकेत विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल, क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळाचा अहवाल, विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा अहवाल, विद्यापीठातील सक्षम अधिविभागांना शैक्षणिक कारणासाठी स्वायत्तता द्या. यासह ७६ ठराव अधिसभेत मांडण्यात येणार आहेत.

तरूण भारत

# विद्यापीठात शनिवारी सौरमानव मार्गदर्शन करणार

कोल्हापूर : सौरऊर्जेच्या प्रचार व प्रसाराचे ब्रीद घेऊन दहा वर्षांसाठी भारतभ्रमण यात्रेसाठी बाहेर पडलेले तसेच 'सौरमानव' तथा 'सोलर गांधी' एनर्जी स्वराज फौंडेशनचे संस्थापक प्रा. चेतन सिंग सोळंकी शनिवारी ११ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठाला भेट देणार आहेत. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ११ वाजता 'हवामान बदल' या विषयावर ते व्याख्यान देणार आहेत. चेतन सिंग सोळंकी हे आयआयटी मुंबई येथे सौरविज्ञान विषयाचे प्राध्यापक असून सौर ऊर्जेच्या प्रचार व प्रसारासाठी भारतभ्रमण यात्रेसाठी दोन वर्षांपूर्वी बाहेर पडले आहेत. सन २०२० ते २०३० पर्यंत ते ही मोहीम राबविणार असून तोपर्यंत कोणत्याही कारणाने घरी न परतण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली आहे. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या सुसज्ज बसमधून त्यांनी ही मोहीम चालविली आहे. विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाने जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट कार्यक्रमांतर्गत व्याख्यान आयोजित केले आहे. तरी जास्तीत जास्त शिक्षक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी केले आहे.

तरूण भारत

# विधी अभ्यासक्रम परीक्षा अर्ज भरण्यास १७ मार्चपासून प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ३ व ५ वर्ष विधी अभ्यासक्रम परीक्षेसाठी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस १७ मार्चपासून सुरूवात होणार आहे. विद्यापीठाने विधी विभागाच्या परीक्षा अर्ज भरण्याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केले आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय व पदव्युत्तर विभागात २३ मार्चअखेर अर्ज करता येणार आहे. महाविद्यालय, पदव्युत्तर विभागाने २४ मार्चपर्यंत परीक्षा अर्ज अ‍ॅप्रुव्ह करून घ्यायचे आहेत. महाविद्यालयांनी विद्यापीठातील परीक्षा विभागात २० ते २७ मार्च दरम्यान परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करावयाच्या आहेत.